पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

## वार्तापत्र

दिनांक: २९/०४/२०२०

# परदेशातून आलेल्या ९ आरोपीतांची चंद्रपूर कारागृहात रवानगी

गडचिरोली पोलीस स्टेशन येथे कझाकीस्तान व किरगीजस्तान या देशाच्या एकुण ०९ नागरिकांवर अप.क्र. १२०/२०२० कलम १४ (ब) विदेशी व्यक्ती अधिनियम १८८, २६९, २७० भादंवि, कलम ३,४, साथरोग प्रतिबंधक अधिनियम कलम २१ महाराष्ट्र कोविड- १९ अंमलबजावणी अधिनियम नियम क्रमांक ११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हा दाखल करण्यात आलेले ०९ आरोपीतांनी दिनांक ०८ मार्च २०२० रोजी दिल्ली येथे भेट दिली असल्याकारणाने त्यांना इन्स्टिट्युशनल क्वारंटाईन करण्यात आले होते. त्यांचा इन्स्टिट्युशनल क्वारंटाईन कालावधी संपुष्टात आल्याने व संबंधीत आरोपीतांनी त्यांना विदेशी व्यक्ती अधिनियमांतर्गत देण्यात आलेल्या व्हिजामधील अटी व शर्तींचे उल्लंघन केले असल्याने त्यांना आज रोजी अटक करण्यात आली. अटक करण्यात आल्यानंतर सरकारी पंचासमक्ष आरोपीतांचे मोबाईल तसेच व्हिजाचे कागदपत्रे जप्त करण्यात आली.

तपासी अंमलदार यांनी आरोपीतांना मा. न्यायालयात हजर करुन मा. न्यायालयास आपला पोलीस कस्टडीचा हक्क अबाधित ठेवत आरोपींना न्यायालयीन कस्टडी मिळावी यासाठी मागणी केली. संबंधीत आरोपींनी त्यांचे वकीलामार्फत जामीन मिळण्यासाठी अर्ज केला. परंतु सरकारी वकील व तपासी अंमलदार यांनी न्यायालयासमोर भक्कमपणे बाजु मांडत आरोपींनी विदेशी व्यक्ती अधिनियमांतर्गत देण्यात आलेल्या व्हिजातील अटी व शर्तींचा भंग केल्याचे निदर्शनास आणुन देण्यात यशस्वी झाल्याने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला व संबंधीत आरोपीतांना मा. न्यायालयाने दिनांक १३/०५/२०२० पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

कायद्यातील तरतुदींनुसार तसेच मोबाईल व इतर बाबींचे तांत्रिक विश्लेषन झाल्यावर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे. घटनेचा पुढील तपास गडचिरोली पोलीस दल करीत आहे.